महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०)

# महाराष्ट्र धार्मिक दाननिधी (पुनर्वसाहतीच्या जागांवरील पुनर्रचना) अधिनियम, १९७०

( दिनांक ३ जुलै, २००६ पर्यंत सुधारित )

(Maharashtra Act No. XXX of 1970)

# THE MAHARASHTRA RELIGIOUS ENDOWMENTS (RECONSTRUCTION ON RESETTLEMENT SITES) ACT, 1970

*( As modified upto 3rd July 2006 )*

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[ किंमत : रु. ४.०० ]

# महाराष्ट्र धार्मिक दाननिधी (पुनर्वसाहतीच्या जागांवरील पुनर्रचना) अधिनियम, १९७०

## अनुक्रमणिका


उद्देशिका. पृष्ठ क्रमांक

कलमे.

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २. | व्याख्या. | १ |
| ३. | भरपाई देण्याची नोटीस. | १ |
| ४. | पुजेचे ठिकाण पुन्हा बांधण्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यास फर्माविण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | २ |
| ५. | पुनर्रचित दाननिधीसंबंधी तरतुदी. | २ |
| ६. | योजना तयार करण्याचे काम पुनर्रचित दाननिधीच्या विश्वस्तांनी न स्वीकारल्यास, धर्मादाय आयुक्ताकडे निर्देश करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | ३ |
| ७. | मालमत्ता पुनर्रचित दाननिधीच्या विश्वस्तांच्या स्वाधीन करण्यास नकार दिल्याबद्दल शास्ती. | ३ |
| ८. | अर्ज. | ४ |
| ९. | अपील. | ४ |
| १०. | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे. | ४ |
| ११. | या चौकशा न्यायिक चौकशा असणे. | ४ |
| १२. | मुदत मर्यादा. | ४ |
| १३. | दावे व कायदेशीर कार्यवाहींबाबत दायित्व निराकरण. | ४ |
| १४. | नियम. | ४ |



(शा.म.मु.) पुच ११५८-१ (६०६७-११-०६).

# सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०[१]

## [महाराष्ट्र धार्मिक दाननिधी (पुनर्वसाहतीच्या जागांवरील पुनर्रचना) अधिनियम, १९७० ]

[१५ जुलै, १९७० ]

**कोणत्याही प्रकल्पासाठी संपादन केलेल्या धार्मिक दाननिधींची राज्य शासनाने दिलेल्या पुनर्वसाहतीच्या जागांवर पुनर्रचना करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** कोणत्याही प्रकल्पासाठी संपादन केलेल्या धार्मिक दाननिधींची राज्य शासनाने दिलेल्या पुनर्वसाहतीच्या जागांवर पुनर्रचना करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकविसाव्या वर्षी याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र धार्मिक दाननिधी (पुनर्वसाहतीच्या जागांवरील पुनर्रचना) अधिनियम, १९७० असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) राज्य शासन, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून या बाबतीत नेमील अशा दिनांकास तो अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(क) " संपादित दाननिधी " याचा अर्थ कोणत्याही प्रकल्पाच्या प्रयोजनाकरिता राज्य शासनाने संपादन केलेले धार्मिक दाननिधी असा आहे ;

(ख) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ जिल्हाधिकारी, असा आहे आणि या संज्ञेत, या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्याची सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडण्यासाठी, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमलेल्या कोणत्याही इतर अधिकाऱ्यांचा समावेश होतो ;

(ग) " प्रकल्प " याचा अर्थ राज्य शासनाने कार्यान्वित केलेला किंवा राज्य शासनाकडून कार्यान्वित करण्यात येईल असा कोणताही पाटबंधारे, वीज किंवा कोणताही इतर प्रकल्प असा आहे ;

(घ) " पुनर्रचित दाननिधी " याचा अर्थ या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे कोणत्याही संपादित दाननिधीसंबंधी मिळालेल्या भरपाईच्या पैशाच्या सहाय्याने पुनर्वसाहतीच्या जागेवर ज्याची पुनर्रचना करण्यात आली असेल असा धार्मिक दाननिधी असा आहे ;

(ङ) " धार्मिक दाननिधी " याचा अर्थ कोणतेही देऊळ, मशीद, चर्च, अग्यारी, सिनेगॉग किंवा धार्मिक पूजेकरिता अथवा इतर सार्वजनिक धार्मिक प्रयोजनाकरिता निर्माण केलेला कोणताही दाननिधी असा आहे ;

(च) " पुनर्वसाहतीची जागा " याचा अर्थ प्रकल्पाकरिता जमीन संपादन केल्यामुळे ज्या व्यक्ती विस्थापित झाल्या आहेत किंवा विस्थापित होतील त्यांच्या पुनर्वसाहतीकरिता राज्य शासनाने दिलेली किंवा राज्य शासन देईल अशी जागा असा आहे ;

(छ) " विश्वस्त " याचा अर्थ धार्मिक दाननिधीचा विश्वस्त असा आहे.

भरपाई देण्याची नोटीस.

**३.** (१) राज्य शासनाने पार पाडलेल्या किंवा राज्य शासन पार पाडणार असेल अशा कोणत्याही प्रकल्पामुळे त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये राज्य शासनाने कोणताही धार्मिक दाननिधी संपादन केला असेल आणि त्याबाबतची भरपाईची रक्कम व ज्या व्यक्तींना अशी रक्कम द्यावयाची असेल त्या व्यक्ती, अशा कायद्यान्वये अंतिमरीत्या निर्धारित करण्यात आल्या असतील त्याबाबतीत तशा अर्थाची अधिसूचना **राजपत्रात** व सक्षम प्राधिकाऱ्यास योग्य

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, महाराष्ट्र शासन राजपत्र, १९६९, भाग पाच, असाधारण, पृष्ठ ५९७ पहा.

वाटेल अशी अन्य रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल. या अधिसूचनेत त्या धार्मिक दाननिधीचे कोणतेही आराखडे किंवा छायाचित्रे असल्यास, त्यांसह किंवा त्या दाननिधीच्या असलेल्या विश्वस्तव्यवस्था संलेखाचा अंतर्भाव करून दाननिधीचे कोणतेही वर्णन किंवा माहिती असलेले दस्तऐवज यांसह त्याचे नाव व विश्वस्तासह ज्या व्यक्तींना भरपाई देण्यात यावयाची आहे त्यांची नावे नमूद करण्यात येतील. तसेच, अशी अधिसूचना **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, भरपाईची मागणी करण्याबद्दल व ती मिळाल्याची खूण म्हणून पावती देण्याबद्दल अशा व्यक्तींना फर्माविण्यात येईल. ज्या विश्वस्तांना भरपाई देण्यात येणार असेल त्या विश्वस्तांनाही सक्षम प्राधिकाऱ्याने अशा अधिसूचनेची एक प्रत पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(२) जर कोणत्याही विश्वस्ताची निश्चित माहिती मिळत नसेल किंवा सर्वच विश्वस्तांनी भरपाईच्या रकमेची मागणी केलेली नसेल व उपरोक्तप्रमाणे साठ दिवसांच्या कालावधीत, अशी भरपाई मिळाल्याची खूण म्हणून सर्व विश्वस्तांनी सही केलेली पावती दिलेली नसेल तर उपरोक्त-प्रमाणे ठरविण्यात आलेली भरपाईची रक्कम या अधिनियमात तरतूद केल्याप्रमाणे पुनर्वसाहतीच्या जागेवर धार्मिक दाननिधीची पुनर्रचना करण्याच्या प्रयोजनार्थ राज्य शासनाकडे निहित होईल.

पूजेचे ठिकाण पुन्हा बांधण्यासंबंधी जिल्हाधिकाऱ्यास फर्माविण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

४. (१) कोणतीही भरपाई कलम ३ अन्वये राज्य शासनाकडे निहित झाल्यास, राज्य शासनास या कलमातील तरतुदींच्या अधीन राहून, सक्षम प्राधिकाऱ्यास एका आदेशाद्वारे असे फर्माविता येईल की, त्या आदेशत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा जागी त्याने धार्मिक दाननिधीची पुनर्रचना करावी, अशी जागा ही, शक्यतोवर, असा संपादित दाननिधी जेथे वसलेले होते त्या क्षेत्रातून विस्थापित झालेल्या व्यक्तींचे ज्या गावी पुनर्वसन केले असेल त्या गावी असेल.

(२) या धार्मिक दाननिधीची पुनर्रचना, यासंबंधात करण्यात आलेल्या नियमातील तरतुदींच्या अधीन राहून, पुनर्वसाहतीच्या जागेवर शक्यतोवर संपादित धार्मिक दाननिधीच्या नमुन्याच्या धर्तीवर करण्यात यावी आणि ती, पुनर्रचना केल्यावर अशा दाननिधीमध्ये ज्यांचा हितसंबंध राहील त्यांच्या, सामान्यत: इच्छा काय आहेत हे शक्यतोवर जाणून घेऊन त्यानुसार करण्यात येईल. तथापि, ती अशा प्रकारे की, राज्य शासनाकडे निहित झालेल्या भरपाईची रक्कम आणि त्या दाननिधीची पुनर्रचना करण्यासाठी मिळालेल्या कोणत्याही अनुदानाची किंवा अंशदानाची रक्कम यापेक्षा पुनर्रचनेचा खर्च अधिक असणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये करण्यात येणाऱ्या नियमांमध्ये, त्या दाननिधीची पुनर्रचना करण्यासाठी स्थायीदानात कोणतीही देवता असल्यास तिची प्रतिष्ठापना किंवा प्रतिमा यासंबंधी धार्मिक स्थायीदानाचे आकारमान, आकृती, वास्तुशास्त्रीय संकल्पचित्र व त्याच्या पुनर्रचनेशी आनुषंगिक किंवा संबंधित असतील अशा सर्व बाबींसंबंधी सक्षम प्राधिकाऱ्यांना असावयाच्या अधिकारांबाबत तरतूद करता येईल.

(४) त्या धार्मिक दाननिधीची पुनर्रचना करण्यात आल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने त्याबद्दल राज्य शासनास कळविण्यात येईल.

पुनर्रचित दाननिधीसंबंधी तरतुदी.

५. (१) प्रत्येक पुनर्रचित दाननिधीची, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० याच्या प्रयोजनांसाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था म्हणून नोंदणी करण्यात येईल ; व सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणीसंबंधी त्या अधिनियमात असलेल्या प्रकरण चार मधील तरतुदी, शक्य असेल तेथवर, त्या अधिनियमाच्या कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत नोंदी करण्यास लागू होतील. अशा रीतीने केलेल्या नोंदी या अंतिम व निर्णायक असतील.

१९५० चा मुंबई २९.

(२) संपादित दाननिधीमध्ये निहित असेल अशी मालमत्ता—स्थावर व जंगम—आणि तिच्यातील सर्व प्रकारचे व स्वरूपाचे हितसंबंध मग ते कोणतेही असोत, अन्य कोणत्याही हस्तांतरण-पत्राविना पुनर्रचित दाननिधीकडे हस्तांतरित झाल्याचे व निहित झाल्याचे मानण्यात येईल ; आणि जर अशा मालमत्तेवर कोणताही बोजा असेल तर, असा बोजा त्या मालमत्तेवरून हस्तांतरित होऊन पुनर्रचित दाननिधीशी संलग्न झाल्याचे मानण्यात येईल व यथास्थिति पट्टेदार, गहाणदार, धनको किंवा इतर कोणत्याही बोजाकाराने त्याच्या अधिकाराचा तदनुसार वापर केला पाहिजे.

(३) उपरोक्तप्रमाणे स्पष्टपणे तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, संपादित दाननिधीच्या संबंधातील सर्व अधिकार, दायित्वे व आबंधने (संविदांसह) आणि विश्वस्तव्यवस्था संलेख, कोणते असल्यास, आणि सर्व दावे व कायदेशीर कार्यवाही हे, कलम ६ च्या पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून ; पुनर्रचित स्थायीदानासंबंधीचे अधिकार, दायित्वे व आबंधने, संविदा व विश्वस्तव्यवस्था संलेख, किंवा यथास्थिति, दावे किंवा कायदेशीर कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

योजना तयार करण्याचे काम पुनर्रचित दाननिधीच्या विश्वस्तांनी न स्वीकारल्यास धर्मादाय आयुक्ताकडे निर्देश करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**६.** (१) राज्य शासनाने, ते ठरवील अशा दिनांकापासून, पुनर्रचित दाननिधी संपादित दाननिधीच्या विश्वस्तांना हस्तांतरित करण्याची तयारी दर्शविली पाहिजे; व हा प्रस्ताव मान्य करण्यात आल्यानंतर, कलम ५ मधील तरतुदींच्या अधीन, तो पुनर्रचित दाननिधी विश्वस्तांकडे निहित होईल व त्या विश्वस्तांनी राज्य शासनाचा आदेश असल्यास त्या आदेशाच्या अधीन राहून या अधिनियमाचा प्रारंभ होण्यापूर्वी संपादित दाननिधीचा कारभार व व्यवस्था ज्याप्रमाणे पाहण्यात येत होती त्याचप्रमाणे पुनर्रचित दाननिधीचा, सर्व कारभार व व्यवस्था पाहिली पाहिजे. मात्र असे करताना, संपादित दाननिधी ज्या विश्वस्तव्यवस्था संलेखान्वये निर्माण करण्यात आले होते तो लेख, तसा लेख असल्यास, विचारात घेण्यात येईल.

(२) प्रस्तावाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत किंवा राज्य शासन यांसंबंधी परवानगी देईल अशा वाढीव कालावधीत विश्वस्तांनी प्रस्ताव स्वीकारला नाही तर, राज्य शासनास आदेशाद्वारे ती बाब धर्मादाय आयुक्ताकडे पाठविता येईल, आणि त्यानंतर मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० यातील कलमे ५०-क व ७२ ख त्यास लागू होणाऱ्या त्या अधिनियमातील सर्व तरतुदी, कलम ५०-क खालील विश्वस्तव्यवस्थांना ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे या पुनर्रचित दाननिधीस लागू होतील.

१९५० चा मुंबई २९.

मालमत्ता पुनर्रचित दाननिधीच्या विश्वस्तांच्या स्वाधीन करण्यास नकार दिल्याबद्दल शास्ती.

**७.** (१) कलम ६ च्या तरतुदींच्या अनुसार, कोणत्याही पुनर्रचित दाननिधीच्या कोणत्याही विश्वस्ताची किंवा विश्वस्तांची नेमणूक केल्यावर, संपादित दाननिधीच्या विश्वस्तांनी, त्यांच्या कब्जात असलेली किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेली संपादित दाननिधीची मालमत्ता पुनर्रचित दाननिधीच्या अशा रीतीने नेमलेल्या विश्वस्तांच्या त्वरित स्वाधीन केली पाहिजे.

(२) कोणत्याही संपादित दाननिधीच्या विश्वस्तांनी [कलम ५ च्या पोट-कलम (२) मधील तरतुदींच्या अंमलबजावणीमुळे पुनर्रचित दाननिधीकडे हस्तांतरित झाल्याचे किंवा निहित झाल्याचे समजण्यात येते.] अशा दाननिधीच्या कोणत्याही मालमत्तेचे पुनर्रचित विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्तांची नेमणूक झाल्यानंतर, पंचेचाळीस दिवसांच्या आत किंवा राज्य शासन यासंबंधी वाढवून देईल अशा कालावधीत, अशा विश्वस्तांकडे हस्तांतरण केले नाही किंवा करण्यास नकार दिला तर, राज्य शासनास किंवा राज्य शासनाने याबाबतीत अधिकार दिलेल्या कोणत्याही प्राधिकरणास, लेखी आदेशाद्वारे, अशा संपादित दाननिधीची मालमत्ता ज्यांच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असेल अशा संपादित दाननिधीच्या विश्वस्तांनी अशी मालमत्ता, पुनर्रचित दाननिधीच्या उपरोक्तप्रमाणे नेमलेल्या विश्वस्तांच्या तात्काळ स्वाधीन करावी असा निदेश देता येईल.

(३) संपादित दाननिधीच्या विश्वस्तांनी, पोट-कलम (२) अन्वये देण्यात आलेल्या निदेशाचे अनुपालन केले नाही तर, अशा विश्वस्तांच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेली मालमत्ता परत मिळविण्यासाठी राज्य शासनास उपाययोजना करता येईल आणि त्या प्रयोजनासाठी राज्य शासनास, काणतेही झडतीचे अधिपत्र काढण्याचा व फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८* यातील प्रकरण सात अन्वये दंडाधिकाऱ्यास कायदेशीररित्या जे अधिकार वापरण्याजोगे असतील त्या अधिकारांचा त्या संबंधात वापर करण्याचा प्राधिकार कोणत्याही अधिकाऱ्यास देता येईल. अशा प्रकारे परत मिळविलेली मालमत्ता उपरोक्तप्रमाणे नेमलेल्या पुनर्रचित दाननिधीच्या विश्वस्तांच्या स्वाधीन केली पाहिजे.

१८९८ चा ५.

(४) संपादित दाननिधीच्या विश्वस्तांनी, पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या कोणत्याही निदेशाचे, त्यांच्या आटोक्याबाहेरची असतील अशा कारणाखेरीज अन्यथा, अनुपालन केले नाही तर, अपराधसिध्द झाल्यानंतर, त्यांना एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीची साध्या कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची किंवा दोहोंची शिक्षा दिली जाईल.

---

* आता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा दोन) पहा.

अर्ज. **८.** (१) हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम याअन्वये सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या किंवा काढलेल्या कोणत्याही निर्णयामुळे किंवा आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत, असा निर्णय किंवा आदेश रद्द केला जाण्यासाठी, राज्य शासनाकडे अर्ज करता येईल. हा अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत स्थगिती आदेश देण्यासाठी त्यात सकृतदर्शनी तथ्य आहे, असे वाटत असल्यास, राज्य शासनास स्थगिती आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही अटी व शर्ती यांच्या अधीन राहून, स्थगिती आदेश देता येईल.

(२) योग्य ती चौकशी व दाखल करण्यात येईल असा तोंडी व लेखी साक्षीपुरावा विचारात घेतल्यानंतर, राज्य शासनास, सक्षम प्राधिकाऱ्याचा निर्णय किंवा आदेश कायम करता येईल, तो परत घेता येईल किंवा त्यात फेरबदल करता येतील.

अपील. **९.** (१) राज्य शासनाचा, या अधिनियमाखालील कोणताही निर्णय किंवा आदेश (कलम ६ अन्वये धर्मादाय आयुक्ताकडे बाब पाठविण्यासंबंधीचा आदेश वगळून) यामळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अपील करण्यासंबंधी केलेल्या नियमांमध्ये तरतूद केलेल्या रीतीने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याअन्वये रचना केलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल. १९६६ चा महा. ४१.

(२) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाच्या अपीलावरील निर्णयाच्या अधीन राहून, राज्य शासनाचा निर्णय हा, अंतिम व निर्णायक असेल.

चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे. **१०.** या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ चौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दाव्यांची न्यायचौकशी करतेवेळी पुढील बाबींसंबंधी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार ही चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा प्राधिकरणास असतील :— १९०८ चा ५.

(क) शपथपत्राद्वारे वस्तुस्थिती सिद्ध करणे,

(ख) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे आणि तिला हजर राहण्यास भाग पाडणे आणि तिची शपथेवर तपासणी करणे,

(ग) दस्तऐवज दाखल करण्यास भाग पाडणे,

(घ) आयोगपत्रे काढणे.

या चौकशा न्यायिक चौकशा असणे. **११.** या अधिनियमाखालील सर्व चौकशा व अपीले ही, भारतीय दंड संहितेची कलमे १९३, २१९ आणि २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक चौकशी असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

मुदत मर्यादा. **१२.** या अधिनियमाखालील अपिलाची मुदत मर्यादा मोजताना, मुदत अधिनियम, १९६३ यातील कलमे ४, ५ व १२ यांच्या तरतुदी, अशी अपीले दाखल करण्यास लागू होतील. १९६३ चा ३६.

दावे व कायदेशीर कार्यवाहीबाबत दायित्व निराकरण. **१३.** हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम यांअन्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा केल्याचे दिसून येणाऱ्या कोणत्याही गोष्टींसंबंधी राज्य शासन किंवा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकरण यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

नियम. **१४.** (१) राज्य शासनास या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, फी लादण्यासाठी करावयाची तरतूद धरून या अधिनियमातील तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ नियम करता येतील.

(२) या कलमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(३) या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमती देतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे संमती देतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून, यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम अंमलात येईल किंवा तो अंमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाच्या राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कायदेशीरपणास बाध येणार नाही.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय. मुंबई